**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५७/२०१७-१८/ 59 दिनांक: 19/03/2018

**आदेश**
**आदेश केस क्र. ५७ /२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री सचिन शामराव गायकवाड<br>F-७ लॅड मार्क रेसिडेन्सी<br>C.S.क्र. २७ सी/३५ ए<br>ई वॉर्ड सरलष्कर भुवन कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग कोल्हापूर<br><br>३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उत्तर उपविभाग, कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

14/3/2018

विज ग्राहक क्र. २६६५१२०९०७९६ हे विज कनेक्शन F-७ Landmark Residency, सर्कीट हाऊसमोर , ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे असून त्यांचा वापर हा रेसिडेन्सीअल सोसायटीचे कॉमन लाईटींग , बोअरवेल इत्यादी कारणाकरिता होत आहे. लॅन्डमार्क रेसिडेन्सी तर्फे श्री सचिन शामराव गायकवाड यांनी त्यांना अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा दिनांक ०५.१२.२०१७ चाआदेश मान्य नसल्यामुळे दि. ११.०१.२०१८ रोजी या मंचामध्ये तक्रार दाखल केली.

**तक्रारीचे स्वरुप**

वरील विज ग्राहकाचे बिल हे चुकून L.T. Industrial Category मध्ये वि.कं. घेतलेले होते. त्यांचे बिल ग्राहक नियमितपणे भरत आले आहे. परंतु वितरण कंपनीला Govt. Auditor चा आदेश प्राप्त झालेमुळे बिलाची वर्गवारी चुकीने होत असून त्यांना L.T. Industrial ऐवजी घरगुती दराने विज बिल भरणे प्राप्त होते त्यानुसार त्यांना विज दर फरकाची रक्कम फेब्रुवारी २०१४ ते मार्च २०१६ पर्यन्तची एकूण २२,३१०/- चे पुरवणी देयक दिल्या गेले.

तक्रारदार चुकीचा वर्गवारी लक्षात आल्या पासूनचे बिल नविन वर्गवारी प्रमाणे भरण्यास तयार आहे व ते भरत आहे. परंतु पुर्वलक्षी प्रभावाने आकारण्यात आलेले रु. २२,३१०/- बिल तक्रारदारास मान्य नसल्याने ही तक्रार उत्पन्न झाली आहे.

**वि.प. भुमिका**

वि.पक्षा तर्फे श्री सुनिल माने, कार्यकारी अभियंता यांनी आपली बाजू स्पष्ट केली. ग्राहकाची वर्गवारी L.T. Industrial चुकीने लावली गेली असली, तरी त्यांना मागील दोन वर्षाच्या फक्त फरकाचे रक्कमेचे पुरवणी देयक देण्यात आले असून त्यावरील व्याज व डी.पी.सी चार्जेस लावण्यात आलेले नाही. त्यांनी या बाबतीत हया रक्कमेचा बोजा एका ग्राहकावर येत नसून तो सामुहीक वापर असलेने सोसायटीतील सर्व ग्राहकावर विभागल्या जात असल्यामुळे ग्राहकानी फरकाची रक्कम भरणे योग्य होईल असे मत मांडले.

वरील दोन्ही बाजूकडील भुमिका ऐकून घेतल्यानंतर या मंचासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात.

१) पूर्वलक्षी प्रभावाने दिलेली फरकाची रक्कम ग्राहकाला भरणे क्रमप्राप्त आहे काय?

उत्तर:- नाही

२) आदेश

उत्तर :- खालील प्रमाणे

**कारणमिमांसा**

F-७ लॅन्ड मार्क रेसिडेन्सी सर्किट हाऊस समोर , ग्राहक क्र. २६६५१२०९०७९६ हे विज कनेक्शन सोसायटीच्या कॉमन लाईटिंग बोअरवेल इत्यादी करिता वापर असून त्यांची वर्गवारी विज वितरण कंपनी तर्फे चूकून L.T. Industrial लावणेत आली. ही बाब स्थानिक लेखापरीक्षा दल यांना त्यांचे परिक्षणा दरम्यान लक्षात आली व वर्गवारी बदलाबाबतचा आदेश दि. १८.०४.२०१६ रोजी त्यांनी वि.प. दिला . त्यानुसार वि.प. एप्रिल २०१६ पासून ग्राहकांची वर्गवारी बदलून विज बिले दिले व ते ग्राहकास मान्य आहे. व ते बिल ग्राहक नियमित भरत आहे. ग्राहकाला वर्गवारी बदलातील मागील दोन वर्षाची फरकाची रक्कम रु. २२,३१०/- हे पुरवणी देयक म्हणून २१, एप्रिल, २०१६ ला देण्यात आले व हे बिल ग्राहकाला मान्य नसल्याने मंचाकडे हे प्रकरण दाखल झाले.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग) दिनांक ११ फेब्रुवारी २००३ रोजी केस क्र. २४/२००१ मध्ये दिलेल्या आदेशामध्ये ग्राहकाच्या वर्गकिरणात पुर्वलक्षी प्रभावाने (Retrospective) बदल करता येणार नाही असे स्पष्ट केले आहे व त्याच निर्णयाचा पुनरुच्चार आयोगाने १९ जुलै, २००४ च्या Clarification order मध्ये ही केलेला आहे त्याच प्रमाणे ॲपेलेट ट्रिब्युनल फॉर इलेक्ट्रिसिटी (APTTE) दिल्ली यांनी दि.७ ऑगस्ट २०१४ रोजी अपिल क्र. १३१/२०१३ च्या निकाल पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, मागील तारखेपासून पुर्वलक्षी प्रभावाने फरकाची रक्कम मागता येणार नाही, चूक निदर्शनास आलेल्या तारखे पासून वीज दर वर्गीकरण बदलता येईल तसेच विद्युत लोकपाल (मुंबई) यांना ही दि. २३.१२.२०१४ रोजी अभिवेदन क्र. १२४५/२०१४ तसेच अभिवेदन क्र. ३ व ४/२०१६ मध्ये दिलेल्या निकालात आयोगाच्या वरील निर्णयाचा आधार घेऊन पुर्वलक्षी प्रभावाने वसूली करता येणार नाही असे स्पष्ट केलेले आहे.

श्री सुनिल माने कार्यकारी अभियंता , हयांनी आपले युक्तिवादात , मा. विद्युत लोकपालांचा, अभिवेदन क्र. ३ व ४/२०१६ मधील आदेश हया त्या विशिष्ट प्रकरणांच्या facts वर बेतलेला असून त्यावरील तक्रारदाराच्या एकूण परिस्थितीमुळे सदर आदेश पारीत करण्यातं आलेला असल्यामुळे त्याचा विचार करता येत नाही, असे मत माडले . तथापि सदर निकालाचा अभ्यास करता, काही विशिष्ट परीस्थितीवरुन, आणि केवळ त्याच प्रकरणास लागू पडणारा आदेश असल्याचे त्यातून दिसत नाही. मा. विद्युत लोकपालांनी त्यांत कायद्याची ठाम बाजू नमुद केलेली आहे. त्यामुळे तो आदेश तश्या सर्व प्रकरणांना लागू पडतो. सबब श्री माने त्यांच्या युक्तिवादाप्रमाणे त्या आदेशास सिमित स्वरुप देता येत नाही व त्यांचा युक्तिवाद मान्य करता येत नाही. वरील आदेश हे साहजिक या मंचावर बंधनकारक असलेने प्रश्न क्र.१चे उत्तर आम्ही नाही दिले आहे.

सबब खालील आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) ग्राहकाची मागणी मान्य करण्यात येत आहे.

२) तक्रारदारास देण्यात आलेले फेब्रुवारी २०१४ ते मार्च २०१६ हे रु. २२३१०/- चे पुरवणी देयक रद्द करण्यांत येत आहे, व ते म.रा.वि.वि.कं.ने परत घ्यावे असा आदेश पारीत करण्यांत येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण